# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**अतितात्काळ :**
**कालमर्यादा दि. ०९.१२.२०१९ : :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-३/२०१९/ 5106
दिनांक : 07 DEC 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व **शासकीय, अशासकीय अनुदानित**
**व विनाअनुदानित** पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रम राबविणा-या तंत्रशिक्षण संस्था.

**विषय :- मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये, आपत्ती व्यवस्थापन योजना विभागस्तरावर बनविण्याबाबत.**
संदर्भ : - तंत्रशिक्षण संचालनालयाकडून प्राप्त झालेला दिनांक १६.१०.२०१९ रोजीचा ई-मेल.

उपरोक्त विषयांकित शासनाच्या दि. १०.१०.२०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने, आपणास कळविण्यांत येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागातील आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याकरीता, आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन विभागाने कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कर्यशाळेमध्ये देण्यांत आलेल्या निर्देशानुसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांशी संबंधित माहिती शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तरी, शासन पत्रात नमूद करण्यात आल्यानुसार आपल्या संस्थेची / कार्यालयाची खालील प्रपत्रात नमूद केलेल्या मुद्यांची बिनचूक माहिती या विभागीय कार्यालयाच्या info.ropune@gmail.com या ई-मेलवर, Excel Sheet मध्ये **दि. ०९.१२.२०१९ पर्यंत** Soft Copy व PDF मध्ये **प्रथम प्राधान्याने** सादर करावी. जेणेकरुन सदरची माहिती संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

| अ. क्र. | संस्थेतील / कार्यालयातील एकूण इमारतींची संख्या | शासकीय, अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांमधील एकूण विद्यार्थ्यांची संख्या. | नैसर्गिक आपत्ती उदा. भूकंप, पूर, वादळ, आग लागणे, औद्योगिक आणि रासायनिक अपघात इत्यादी प्रसंगी आपल्या संस्था / कार्यालयामार्फत करण्यात आलेली आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था याबाबत माहिती. |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |

संस्था / कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

ropune regional office <ropune@dtemaharashtra.gov.in>

# मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये आपत्ती व्यवस्थापन योजना विभागस्तरावर बनविण्याबाबत

**DESK12 Desk Officer** <desk12@dtemaharashtra.gov.in> 16 October 2019 at 15:34
To: Romumbai regional office <romumbai@dtemaharashtra.gov.in>, ropune regional office <ropune@dtemaharashtra.gov.in>, ronashik regional office <ronashik@dtemaharashtra.gov.in>, roaurangabad regional office <roaurangabad@dtemaharashtra.gov.in>, roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>, ronagpur regional office <ronagpur@dtemaharashtra.gov.in>

उपरोक्त विषयांकित शासनाच्या दि. 10.10.2019 च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागातील आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याकरीता आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन विभागाने कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कार्यशाळेमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार संचालनालय तसेच अधिनस्त सर्व विभागाशी संबंधित माहिती शासनास सादर करणे आवश्यक आहे. तरी, शासन पत्रात नमूद करण्यात आल्यानुसार आपल्या विभागातील सर्व शासकीय, अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्था/ कार्यालयांची खालील नमूद माहिती या संचालनालयास तात्काळ दि. 02.11.2019 पर्यंत सादर करावी.

1) विभागांतर्गत असलेल्या एकूण इमारतींची संख्या
2) शासकीय, अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांमधील एकूण विद्यार्थ्यांची संख्या
3) नैसर्गिक आपत्ती उदा. भूकंप, पूर, वादळ, आग लागणे, औद्योगिक आणि रासायनिक अपघात इ. याप्रसंगी संबंधित संस्था/कार्यालयामार्फत करण्यात आलेली आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था याबाबत माहिती